# नारबाः उध्वस्त ग्रामजीवनाचा लेखाजोखा मांडणारा आनंद यादवांचा एक द्रष्टा प्रतिनिधी

**प्रा.डॉ. प्रदीप राऊत**
*गिलानी महाविद्यालय, घाटंजी, जि. यवतमाळ*

ग्रामीण कादंबरीकार आनंद यादव यांनी आपल्या विविध कादंबऱ्यांमधून मुख्यत्वेकरून ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला आहे. यादवांची 'गोतावळा' (1971) ही कादंबरी तर जणू तत्कालीन ग्रामजीवनाचा लेखाजोखाच मांडते. नारबा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून यादवांना ग्रामीण जीवन रेखाटता आले. त्यामुळे कादंबरीचा नायक नारबा हा उध्वस्त ग्रामजीवनाचा लेखाजोखा मांडणारा आनंद यादवांचा एक द्रष्टा प्रतिनिधी ठरतो, असेच म्हणावे लागेल. अर्थातच, ग्रामीण भागात भोतकामासाठी ट्रॅक्टरचे आगमन झाल्याने झालेले गंभीर परिणाम कादंबरीकाराने टिपल्याने कादंबरीचा नायक ठरणारा नारबा व त्याचे उध्वस्त झालेले भावविश्व, नारबाचे बोलणे, जगणे यावरील समीक्षकांच्या विविध प्रतिक्रिया यातूनच या द्रष्टेपणाची जाणीव होते. नारबा जे जे काही बोलला ते आज प्रत्यक्षात 21 व्या शतकातही दिसून येत आहे. थोडक्यात, 21 व्या शतकातही यांत्रिकीकरणामुळे भरडू शकणाऱ्या ग्रामीण जीवनाची स्पष्ट जाणीव तर द्रष्ट्या नारबाने 4 दशकापूर्वीच करून दिलेली असल्याने तो आनंद यादवांचा एक खरा द्रष्टा प्रतिनिधी शोभतो.

आपल्या मालकाच्या शेतावर केवळ राबराब राबणारा व ज्याला केवळ ढोरासारखेच राबणे व वागणे एवढेच माहीत आहे असा कोल्हापूर कागल परिसरातील एक अविवाहित पुरूष म्हणजे नारबा. शेतमजूर म्हणून राबणारा व आईवडिलाविना पोरका असलेला हा अंदाजे वीस वर्षाचा तरूण 'गोतावळा'चा खरा नायक आहे. कादंबरीतील सर्व कथानक त्याच्याभोवतीच फिरते. आपली सारी जीवनकथाच तो साऱ्या कादंबरीभर निवेदन स्वरूपात सांगतो. आपल्या मनातील नैसर्गिक कामवासनेचे सतत दमन करणारा व गुराढोरांच्या व प्राण्यांच्या गोतावळ्यात राहणारा हा नारबा ट्रॅक्टरच्या आगमनामुळे मात्र पार खचून जातो. मालकाने शेतातील व इतर कामे करण्यासाठी ट्रॅक्टर आणल्यामुळे त्यास नारबाची गरज वाटत नाही. ज्या मालकाच्या शेतात आपण ढोरासारखे काम केले त्याच शेतमालकाला आपली आता अजिबात गरज नाही, असे जाणवताच तो अतिशय दुःखी बनतो. याशिवाय आजवर आपण ज्या गोतावळ्यात वावरलो तो सारा गोतावळा आता नष्ट होणार अशा जाणिवेने तर तो पुरता खचतो. मालकही त्याच्याशी खटकून वागू लागतात. आपण आजवर जे काही समजत होतो तसे हे जग राहिलेले नाही, जगातील प्रत्येक माणूस हा स्वार्थी आहे, आपल्या स्वार्थासाठी तो कोणत्याही स्तरावर जावू शकतो, असा त्यास एक साक्षात्कार होतो.

नारबा हा शेतमजूर असला तरी आपल्या गोतावळ्यात असणाऱ्या सर्वांची सतत चिंता करतो. अर्थात, एक नोकर व शेतकाम करणारा व्यक्ती म्हणून आपले कर्तव्य पार पाडताना शेतात राहणाऱ्या सर्व प्राण्यांची दखल घेणे त्यास आवश्यकच होते. पण तो मुळातच संवेदनशील असल्यानेच प्राण्यांची तो नको तेवढी काळजी वाहतो व नको तेवढी तो चिंता करतो. आपणास जादा पैसा मिळावा वा मालकाकडून आपली वाहवा व्हावी अशी देखील त्याची अपेक्षा नव्हती. तरीही शेतातील बैल, गाय, रेडा, घोडे, कोंबडे याचा तो विचार करतो? एवढेच नाही तर ट्रॅक्टरचे आगमन होताच, आपल्या गोतावळ्याचे काय होईल? या चिंतेने तो ग्रासतो. नारबाने केलेला बैल, गाय व रेडा यांच्यासंदर्भातील विचार त्याच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडविते. म्हणूनच संवेदनहीन मालकाबद्दल तो म्हणतो, 'इतीइतीच्या तासासाठी ढोरं मरत्यात तरी मालकाला माया फुटत न्हाई.'(पृ.10) त्याच्या अनेक उद्गारातून त्याच्यातील संवेदनशीलतेचे दर्शन घडते. ...'समदी ढोरं पाणी प्यायची हाईत. धा–ईस बारड्या वडून काढाव्या लागतील.'(पृ.10) अशाप्रकारचा विचार तर तो नेहमीच करतो. ...बैलांबद्दल नारबा मालकास सांगतो, 'मालक, बैलांस्नी पेंड–भरडा कायतरी सुरू केलं पाहिजे'(पृ.25) एवढेच नाही तर मालकाने जेव्हा बैल विकायला काढले तेव्हा त्याने मालकास विरोध केला. ज्या बैलांनी राबराब राबून शेतमाल पिकविला त्या बैलांना विकण्याची कल्पनाच त्यास अमान्य होती. तो सांगतो, 'नगं नगं म्हटलं तर मालकानं थोरली बैलं इकायला काढली.'(पृ.113) एकदा ट्रॅक्टरच्या चालकाने एका पाड्यास मारले तेव्हा नारबा त्यास म्हणाला, 'याद राख पुन्ना पाड्याच्या अंगावर काठी टाकलीसा तर.'(पृ. 139) यातून नारबाचे प्राणी प्रेम दिसून येते.

...गाय दूध कमी देत आहे? असा प्रश्न मालकीणबाईने करताच नारबा म्हणतो, 'तिला फळून आता साव्वा मैना सपला. किती पिळायची तिला?'(पृ.5) ....खरं म्हणजे नारबाला मालकाच्या गाईची चिंता करण्याचे काही कारणच नाही. पण 'किती पिळायचे तिला' असे सांगून तो आपली गायीबद्दलची चिंता व्यक्त करतो. अर्थातच, आपल्या मालकापेक्षा एका मुक्या जणावराबद्दल त्यास वाटणारी कणव ही मोठी ठरते. म्हणूनच त्यास वाटणारी ही कणवच त्याच्या संवेदनशीलतेचे द्योतक ठरते. सापडलेल्या कासवालाही त्याने अभयच दिला.(पृ.19) मालकाचा घोडा मेल्याने तर त्यास अतिव दुःख झाले.(पृ.51) घोड्यासंदर्भात तो म्हणतो, 'उघडी झालेली हाडं बघून मन उदास झालं.'(पृ.66) ट्रॅक्टरच्या चालकालाही तो रागाने म्हणतो, 'मळा काय ह्या डायव्हरच्या बाचा न्हवं. ढोरं जतन करताना काय काय करावं लागतय हे ह्येला काय कळणार हाय?'(पृ.140) 'धनी मेल्यागत जनावरं निघून गेली तसं मीबी त्येंच्यामागं जायला पाहिजे हुतं.'(पृ.141)

नारबाला निसर्गाचाही आदर वाटतो. त्यामुळेच इथली झाडे तोडल्या जावू नयेत, इथली सृष्टी चांगली दिसावी असे त्यास वाटते. शेतात असणारा पिंपळ तोडण्यासाठी जेव्हा काही माणसे शेतात आली तेव्हा नारबाने त्यांना स्पष्ट सांगितले, 'मी हितल्या झाडाला हात लावू देणार न्हाई.'(पृ. 131) मालकालाही तो सांगतो, 'मालक, पिप्पळ कशाला तोडता?'(पृ.132) मालक मात्र म्हणातो, 'ठेवून तरी काय फायदा? ना फळ ना फूल.' पण नारबा लगेच मालकाला सांगतो, 'माळाला चरणाऱ्या ढोरांस्नी सावली हुती. तेवढीच माळाला सोभा.'(पृ.132) ...शेतावर आलेला ट्रॅक्टरही त्यास भूतासारखा वाटतो.(पृ.135) का? कारण, या ट्रॅक्टरमुळे गुराढोरांकडे दुर्लक्ष होणार होते. आजूबाजूची सारी झाडे तोडावी लागणार होती. नारबाला मात्र असे काही होणे असह्य वाटणारे होते. या ट्रॅक्टरच्या आगमनामुळे नारबाची स्थिती दयनीय झाली.

संयमी माणसे आपल्या कामवासनेचा उद्रेक होवू देत नाही. ...नारबा सुद्धा आपल्या वासनेचा उद्रेक होवू देत नाही. म्हणूनच तो संयमी ठरतो. तो मनातील कामवासना दडपून ठेवतो. शेतात येणाऱ्या कोणत्याही स्त्रीबद्दल तो अश्लील विचार करीत नाही. आपला विवाह व्हावा असे त्यास वाटत असले तरी, आपला विवाह करून द्यावा असा नको तितका आग्रह सुद्धा तो मालकाकडे करीत नाही. अर्थातच, असे वर्तन नारबाकडून का घडावे? त्याचे असे हे वर्तन त्याच्या संयमशीलतेचीच जाणीव करून देते. शेतात असणारे सर्व प्राणी जणू त्याच्या या वासनेत अधिक भरच टाकतात. तो शेतावर चालणारा प्राण्यांचा मुक्त लैंगिक व्यवहार आपल्या उघड्याा डोळ्याने न्याहाळत असतो. त्यामुळे त्याच्या मनातही वासनेचा उद्रेक होतो. पण हा सारा उद्रेक तो दाबून टाकतो.

नारबा अखेर एक तरूण आहे. 'बायकू ही पर्तेकाला पाहिजेच. देवानं नर–मादी केलीया कशाला?'(पृ.123) असे म्हणणाऱ्या नारबास, आपणास बायको असावी असे वाटणे अगदी रास्त आहे. तो म्हणतो, 'दीसभराच्या कामानं अंग आंबून जातंय, पर सांगणार कुणाला? बायकू असती तर तिनं तेल तरी माखलं असतं नि अंग रगडलं असतं. रातभर इस्वाटा मिळाला असता, मन थंड झालं असतं'(पृ.14) आपल्या मनीची व्यथा मांडताना तो जाणीवपूर्वक आपले लग्न टाळणाऱ्या मालकास म्हणतो, 'चार सालांत लगीन करून देतो म्हणाला हुता. आता ईस सालं झाली.'(पृ.15) मालकाच्या मुलीबद्दल तो म्हणतो, 'तिला मातूर पाडा बघायला मालक दोन सालं हिंडला. पदरचं पैसं देऊन लगीन करून दिलं.मी हितंच बिनबायकूचा. तोडलेल्या झाडाच्या हुब्या बुडक्यागत भुंडा.'(पृ.15)

नारबाचा विचार पुढेही काही थांबत नाही. तो पुढे मनातल्या मनात म्हणतो, 'आता गाडीबी बंद. कुळव बंद. बैलांचा नागूर बंद. कोळपी बंद, सगळं बंद....धनी मेल्यागत जनावरं निघून गेली तसं मीबी त्येंच्यामागं जायाला पाहिजे हुतं. '(पृ.141) 'आतापतोर लई सोसलं मालक.'(पृ.140) असे म्हणणारा नारबा सांगतो, 'कामं करून मरमर केली तरी मालकाला माया न्हाई...जातीनं कुदांडपणानं आपल्या जल्माचं वाटूळं करून घेतलं. एवढी कामं करून मरत्यात खरं; कुणाला कळकळच येऊ देत न्हाईत.'(पृ.107) एकंदरीत, नारबाने खूप काही सहन केले. म्हणूनच तो स्वतःबद्दल सांगतो, 'बैलांबरोबर बैल झालो असतो नि दावणीला गपगार बसलो असतो तर बरं झालं असतं....'(पृ. 115) 'माझा जीव उनात पडलेल्या रानागत भेगाळत चालला. कायच बोलता येत नव्हतं.'(पृ.114) ....नारबाची अशी स्थिती लक्षात येताच कुणाच्याही मनात प्रश्न निर्माण होईल की, नारबाला बैल का व्हावेसे वाटले? त्याची बोलती का बंद झाली होती? अर्थातच, त्यास खूप बाबी नाईलास्तव सहन कराव्या लागल्याचे व त्याने त्या सहन केल्याचेच यातून सूचित होते. ....थोडक्यात, नारबाच्या या निवेदनातून त्याच्या द्रष्टेपणाचीच स्पष्ट जाणीव होते. कारण, आज समाजात असे अनेक 'नारबा' दिसून येतात.

**नारबासंदर्भात समीक्षक व रसिकांची मते–**

आनंद यादवांसह कादंबरी समीक्षक अविनाश सप्रे, एस. एम.कानडजे, वा.ल. कुलकर्णी, अरविंद वामन कुलकर्णी, प्रभाकर पाध्ये, र.बा. मंचरकर, या.वा.वडस्कर, रवींद्र ठाकूर चंद्रकांत बांदिवडेकर व रसिक असणारे हरिच्चंद्र थोरात, हेमा लेले, नामदेव ढसाळ व अनिल किणीकर यांनी नारबासंदर्भात आपली मते नोंदविली आहेत.

आनंद यादव स्पष्ट सांगतात, 'नारबाचे जे भावविश्व आहे ते ट्रॅक्टरच्या निमित्तानं उद्ध्वस्त होत आहे' 'त्याला आपल्या जाणिवेत–नेणिवेत हे सारे विश्वच आता कुठे तरी मिटू लागले असे दिसते आहे.'जणू तो स्वतःच अंशाअंशाने, कणाकणाने मरत आहे.' ...अविनाश सप्रे यांनाही हा नारबा दुदैवी वाटतो, एकाकी वाटतो. ते त्याच्या भावविश्वाबद्दल सांगतात, 'त्याचे सारे भावबंध तो ज्या शेतावर राहतो तिथली माती, जनावरं, कुत्री, मांजरं, झाडझुडपं यांच्याशी जखडलेली आहेत.' ...एस. एम. कानडजे म्हणतात, कृषिनिष्ठ जीवनातून आणि गुराढोरांच्या गोतावळ्याातून नारबाची हकालपट्टी केल्यामुळे त्याला आत्मभ्रंशाची बाधा झाली आहे.' ते आणखी सांगतात, 'नारबाच्या वासना–जाणिवा या ढोरांच्या पातळीवरच्या वासना–जाणिवा आहेत.' 'त्याचे मन विलक्षण संवेदनक्षम आहे.' 'पोरकेपणा आणि लैंगिक अतृप्तीचा शाप भोगणाऱ्या नारबाचा विलक्षण एकाकीपणा व्यक्त करण्यात आला आहे. '

वा.ल.कुलकर्णी यांना हा नारबा एकाकी वाटतो, हतबल वाटतो, माणूस वाटतो, त्याचे जीवन निरस वाटते, त्याच्या जीवनात एक भयाण पोकळी निर्माण झाली असे वाटते, आपल्या अभिप्रायात ते म्हणतात, 'माणसाच्या प्रेमाचा ओलावा त्याच्या जीवनाला कसा तो ठाऊक नाही.' 'ट्रॅक्टरच्या आगमनामुळे नारबाचे गणगोत उद्ध्वस्त होते व त्याचे भावजीवन उधळले जाते.' त्याच्या भावजीवनाबद्दल ते म्हणतात, 'नारबाच्या भावजीवनात माणसांपेक्षा पशुपक्ष्यांनाच स्थान आहे.' ...अरविंद वामन कुलकर्णी यांना नारबा हा पोरका वाटतो, नव्या दृष्टिकोनापासून दूर वाटतो, संवेदनशील वाटतो, अगतिक वाटतो, एवढेच नाही तर 'सजीव कॅमेरा' वाटतो, 'जमिनीत घुसलेल्या नांगराचा एक फाळ वाटतो.' आपल्या अभिप्रायात ते म्हणतात, 'त्याचे गुराढोरावरचे प्रेम, मळ्यासाठी चाललेली राबणूक, त्याच्या

मनावर आलेला एकलेपणाचा तवंग आणि यातून उद्‌भवणाऱ्या लैंगिक विकृतींना बळी न जाता ढोरागुरांच्या, मळ्याापाण्याच्या, पिकापक्षांच्या संगतीत राखलेला मनाचा तोल— या वैशिष्ट्याांनी त्याचे व्यक्तिमत्त्व साकार होते.'

प्रभाकर पाध्ये यांनाही नारबाचे भावविश्व उद्ध्वस्त झाले आहे असे वाटते, त्याचे जीवनही शेणामुतांतले, घामेजलेले आणि प्राथमिक पातळीवरचे वाटते. अभिप्रायातही ते म्हणतात, 'स्त्रिसंगाच्या अभावामुळेच नारबाचे भावविश्व कोसळते. स्त्रिसंगाची उणीव निसर्गातून गोतावळा निर्माण करून काढण्याचा तो प्रयत्न करतो. पण हा गोतावळाही कोसळतो. स्त्रिसंगाच्या ऐवजी निसर्गाशी तो संबंध जोडतो, पण हा संबंधही उद्ध्वस्त होतो' ...र. बा. मंचरकर यांनाही नारबा हा अनाथ वाटतो, अर्धा ढोर माणूस वाटतो, आदिम मनोभूमिकेचा वाटतो. 'त्याच्या आयुष्याचे दोर कापलेले आहेत. बायकोशिवाय जगाव्या लागणाऱ्या ओंगळ जिण्याने त्याच्या संवेदनांना तल्लखपणा दिला. त्यामुळे तो शेताराणाशी आणि पशु पाखरांशी आत्मीय धागे जोडीत जातो. माणसांच्या मायेची भूक अशी भागवून विकृतीची आडवळणे टाळीत आपल्या मनाचा तोल सावरतो.' ...या. वा. वडस्कर सांगतात, ''गोतावळा'मध्ये ग्रामीण महाकाव्याची अभिव्यक्ती नारबाच्या मुखातून केली जाते.' 'मानवी श्रमिक समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नारबाची स्थिती जवळजवळ जनावराच्या पातळीपर्यंत अवनत झालेली आढळून येते.'

रवींद्र ठाकूर यांनाही नारबा उद्ध्वस्त माणूस वाटतो. ते सांगतात, 'ढोरागुरांबरोबर तोही एक ढोर होऊन जातो. पण तो आपलं माणूसपण विसरू शकत नाही.' ...चंद्रकांत बांदिवडेकर यांनाही नारबाची कहाणी एक दर्दभरा जीवनपट वाटतो, तो त्यांना निराधार वाटतो, दुबळा वाटतो, दुःखी माणूस वाटतो. एवढेच नाही तर त्याचे जीवन निरर्थक वाटते. ते पुढे सांगतात, 'नारबा निरतत्त्वाने प्राणी जगताशी जोडला गेला आहे.' 'नारबाला चीड आहे पण शेतमजूराच्या सौम्य स्वभावाप्रमाणे ही चीड विद्रोहाचं रूप कधीच घेत नाही.'

हरिच्चंद्र थोरात सांगतात, 'नारबाचे जग मानवनिर्मित वास्तवामुळे नष्ट होऊ घातले आहे.' पुढे ते म्हणतात, 'नारबाला भविष्य नाही.' ...हेमा लेले सांगतात, 'नारबाचे व्यक्तिचित्र आपल्याला फार अस्वस्थ करते.' 'नारबाचे उद्ध्वस्थ मानसिक जीवन हा यंत्रयुगाचा एक अपरिहार्य परिपाक होय.' एवढेच नाही तर हा नारबा म्हणजे त्यांना, शेतावर आयुष्यभर राबणाऱ्या एका गड्याचं प्रातिनिधिक चित्र वाटते ...नामदेव ढसाळ यांनाही नारबा हा शोषक वृत्तीचा एक बळी वाटतो, अनिल किणीकर यांनाही तो एक एकलेपणाची जाणीव झालेला माणूस वाटतो.

निष्कर्ष— कादंबरीकार व समीक्षक यांनी व्यक्त केलेल्या या विविध मतांमधून नारबाच्या कष्टी व दुःखी जीवनाची व त्याच्या निरक्षरपणामुळेच उद्ध्वस्त झालेल्या त्याच्या एकाकी जीवनाची साक्ष पटते. त्यामुळेच तो तत्कालीन वर्तमान व भविष्यातील अर्थात 21 व्या ातकातील उध्वस्त ग्रामजीवनाचा लेखाजोखा मांडणारा आनंद यादवांचा एक द्रष्टा प्रतिनिधी ठरतो.

## संदर्भ टीप—


1. *आनंद यादव, गोतावळा, मौज प्रकाशन, मुंबई. आ. दुसरी 1974)*
2. *आनंद यादव, ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आ. तिसरी 1993*
3. *आनंद यादव, साहित्याची निर्मितिप्रक्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आ. दुसरी 1999*
4. *अनिरूद्ध कुलकर्णी, (संपा) प्रदक्षिणा खंड 2, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आ. दुसरी 1998*
5. *कानडजे एस. एम., आनंद यादव साहित्य आणि जीवन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. आ. पहिली 1995*
6. *किर्ती आनंद यादव, (संपा.) आनंद यादव यांची गोतावळा, प्रतिमा प्रकाशन, पुणे. आ. पहिली 1991*
7. *रवींद्र ठाकूर, आनंद यादवः व्यक्ती आणि वाङमय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आ. पहिली 1993*
8. *चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरीः चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग पुणे. आ. दुसरी 1996*
9. *खोले विलास, (संपा.) गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोकवाङ्मयगृह, मुंबई. आ. पहिली 2003*